
# जनशक्ति

दिवाळी उद्योग विशेषांक २०११

किंमत रु. ४०/-



# जैन सौर उत्पादनांनी धरली प्रगत तंत्रज्ञानाची कास
# संपला अंधाराचा प्रवास, प्रकटला दिव्यप्रकाश..!






वॉटर हीटर ■ कंदील ■ होम लायटींग ■ पॉवर पॅक (इन्व्हर्टर) ■ स्ट्रीट लायटींग
ट्रॅकरसह सौरपंपः शेती, घरे व हातपंपासाठी ■ ग्रीड कनेक्टेड पॉवर प्लांट

*शासकीय अनुदान उपलब्ध

*अटी लागू

MNRE

International Organization For Standardization

Government of India
Ministry of commerce & Industry
Department of commerce
Directorate General of Supplies & Disposcle

CRISIL RESEARCH

जैन सौरवंत®

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन ज्योत®

जैन ग्रीन एनर्जी पार्क; पो. बॉ. २०, जळगांव-४२५००२; फोनः ०२५७ ६६३०६१४, मनोज सुतावणे- ०२५७ ६६३०६०९
फॅक्सः ०२५७ २२६११५५; ई-मेलः solar@jains.com; वेबसाईटः www.jains.com

*सूर्यनारायणासमवेत संयुक्त प्रकल्प!*


**ज्ञानेश्वर भिसे** ९४२२७७५९३० (अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड) **लक्ष्मण धांडे** ९४२२७७५९२८ (अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा) **अनुप आगीवाल** ९४२२७७५९२७ (जळगांव, धुळे, नाशिक) **विजय उरमुडे** ९४२२७७५९३९ (सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, बेळगाव, गोवा) **देवीदास पाटील** ९४२२७७५९३१ (पुणे, सातारा, रत्नागिरी) **प्रवीण कुलकर्णी** ९४२२७७५९३३ (सोलापुर, उस्मानाबाद, लातूर) **दीपक पाटील** ९८७०९९०७५० (मुंबई, ठाणे, रायगड) **राजेश कपाले** ८६००९९३९०७ (नागपूर) **भागवत कुंभार** ९४२२७७५९४० (नांदेड, परभणी, हिंगोली)

# आकांक्षा नव्या क्षितीजाची









Our nature is our Future असं जे म्हटलं जातं ते प्रसिध्द उद्योजक श्री. अशोक भवरलाल जैन यांच्याकडे पाहिल्यानंतर सहजगत्या पटतं. केवळ सकारात्मक दृष्टीकोन सामाजिक भावना आणि व्यवसायिक जगतात भरारी घेण्याची जिद्द या बळावर भवरलाल जैन यांच्या उद्योगसमुहाचे सध्याचे व्हाईस चेअरमन श्री. अशोक जैन,उद्योग व्यवसायासह विविध सामाजिक संस्थांच्या महत्वपूर्ण पदांवरील अशोकजींच्या कर्तुत्वाची झळाळी त्याच्या धडपड्या व समाजशील व्यक्तीमत्वाची साक्ष देते.

हाडाचे शेतकरी असलेल्या वडिलांनी "आपण कोणाचं वाईट केलं नाही, तर आपलं कधीच वाईट होत नाही" अशी बालपणापासून शिकवण दिली. आईने कोणतीही चुक पदरात न घेता प्रसंगी चांगल्या कामाचं कौतुक करून प्रोत्साहन दिलं आणि आत्मविश्वासाची बीजं पेरली.

ज्यावेळी दै. जनशक्तिच्या दिवाळी विशेषांकाच्या यशस्वी उद्योजक या संकल्पनेवर आधारित बोलतांना विचारले असता, तुमच्या कंपनीत सध्या किती कामगार कामास आहे, त्या प्रश्नाच्या अनुशंगाने त्यांचे उत्तर होते, आमच्या कंपनीत ६००० सहकारी वर्ग कामास आहे. कर्मचारी वर्गाला देखील आम्ही सहकारी म्हणूनच वागतो. इतकेचं नाही तर, प्रत्येकाला कंपनीच्या नावाचे शेअर्स देखील दिले जातात. त्यांच्यासाठी रोज वेगळी खिचडी केली जाते. कर्मचारी वर्गात युनिअन नसल्यामुळे कोणत्याही भागातील काम करणाऱ्या सहकाऱ्याला कोणतीही अडचण आली तरी तो सहज व्हाईस चेअरमन सरांना भेटू शकतो. इतक्या मोठया प्रमाणावरचं स्वातंत्र्य आपल्याला जैन इरिगेशनमध्ये बघायला मिळते. सहकाऱ्याला अडचण सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, कोणतीही असो जैन बंधूंकडून ज्या प्रमाणात सहकार्य करता येईल त्या प्रमाणात केलं जातं.

ज्यावेळी अशोक यांना त्यांच्या यशस्वीतेचे रहस्य काय असे विचारले गेले तेव्हा त्यांनी अर्थातचं त्यांच्या वडिलांची व आईची आठवण आवर्जून काढली. ते म्हणाले आई, वडिलांनी आम्हा चारही भावंडांना ज्या सुसंस्कारांनी घडविले त्यामुळे हे सर्व काही शक्य आहे. त्याबरोबर माझे असे मत आहे की, प्रत्येक उद्योजकासाठी वेळ (Time) ही अत्यंत मौल्यवान आणि दुर्मिळ बाब आहे. एक वेळ पैसा, मनुष्यबळ, इतर संसाधने, पुन्हा उभी करता येऊ शकतात. परंतु "If you cannot manage your time, nothing can be managed by you." Work is life of life is work! या तत्वामुळे मी कंपनीतील कामाला प्राधान्य देतो. कामाच्या जबाबदारी बरोबर तुम्ही सामाजिक कार्यात कसे योगदान देतात याविषयी विचारले असता ते म्हणतात, प्रत्येक मनुष्य समाजाचा काही तरी ऋणी लागतो. याच भावनेतून समाजातील होतकरू तरूण-तरूणींसाठी वेगवेगळया सवलती देण्यासाठी तयार असतो. जेणेकरून भविष्याचे शिल्पकार तयार व्हावे. यासाठी येणारा प्रत्येक दिवस नविन असतो. compitition रोज मोठ्या प्रमाणात बघायला मिळते. त्यातही आपलं उत्पादन टिकून राहण्यासाठी उत्पादनाची गुणवत्ता टिकवून ठेवणं खरच फार महत्वाच ठरतं.

तरूणांना मौलिक मार्गदर्शनात काय सांगाल? असं ज्यावेळी अशोकजींना

विचारले तेव्हा ते म्हणाले globalisation च्या युगात प्रत्येक दिवस, क्षण न क्षण महत्वाचा आहे. तरूणांनी प्रसिध्दीच्या मागे न धावता Hardwork केलं पाहिजे. केलेल्या कामाची जरूर परमेश्वराकडे नोंद होत असते. ज्यामुळे एक ना एक दिवस नक्कीचं तुमचं यश घेऊन येणारा असतो त्यासाठी आधी फळाची अपेक्षा न करता कष्टाची तयारी ठेवली पाहिजे. ध्येय निश्चित करून त्याचप्रमाणे स्वप्नांची planning केली पाहिजे. भविष्यातील काही नवे प्रकल्प या प्रश्नाविषयी विचारले असता जैन म्हणातात, ठिबक सिंचनाच्या माध्यमातून भाताची शेती करण्याचा मानस आहे. जेणेकरून भाताची निर्मिती ही ३०% ते ४०% ने वाढेल, अशी अपेक्षा आहे. त्याच बरोबर खान्देशातील शेतकऱ्यांसाठी वेगवेगळया प्रकारची प्रशिक्षण वर्ग कर्तव्य भावनेने झपाटून शेतकऱ्यांचे मेळावे, भेटीगाठी अशी मोहिम तर चालवली जातेच परंतु याबरोबर नविन तंत्रज्ञान आणि प्राचीन यातील साम्य आणि भेद जवळून ओळख करून देऊन अद्यावत माहिती त्यांना पुरविली जाते/जाईल.

शेती संस्कृतीला अत्यंत अनमोल ठरणारी आणखी एक संस्था जैन उच्च तंत्र शेती संस्थान शेतीमालावर संशोधन विकास व प्रात्याक्षिके प्रशिक्षण आणि विस्तार केंद्र पडिक जमिनीचा विकास, नापिक जमीन लागवडीखाली आणणे, मृदा संधारण, डोंगराळ व खडकाळ जमिनीवर लागवड करणे, पावसाच्या पाण्याचे पुर्नभरण करणे, जलसंधारणाचे व्यवस्थापन, खतपाणी-हरीतगृहे व त्याचबरोबर सेंद्रीय आणि जैव खते तसेच जैव किटकनाशके हे सर्व एका छत्राखाली असलेलं पाहण्यासाठी दरवर्षी किमान २०,००० शेतकरी व इतर इच्छुक या शेतीला प्रत्यक्ष भेट देतात व त्या सर्व कामात आणि शेतीतील उच्च तंत्र व त्यामधील आधुनिक विकास पाहण्यास साक्षी राहतात. या सर्व शेती आधारीत उद्योगांमध्ये आजतागायत सुमारे ७०० कोटींवर भांडवली गुंतवणूक झालेली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात कशाही प्रकारे विचार केला तरी हा आकडा निश्चितच कौतुकास्पद आहे.

अशोकजी हे वेगवेगळया सामाजिक संस्थांमध्ये सक्रिय सहभागी होत असल्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्वातलं वेगळेपण त्याच्या नेतृत्वात होत असल्यामुळे विविध उपक्रमांच्या माध्यमातून जळगांवकरांना अनुभवता येतं.

अशोक जैन आत्मविश्वासानं आणि अभिमानानं सांगतात , यापुढचा काळ तर इ-बिझनेस आणि इ-ट्रॅन्झॅक्शन्सचा आहे. संगणकाच्या जाळयामुळे लोकांना कोणत्याच कारणासाठी घराबाहेर पडावं लागणार नाही, असे भाकित तज्ञ सांगतात. त्या स्थितीमध्ये तर जैन इरिगेशन सारख्या कंपन्याचं काम प्रचंड वाढणार आहे. सर्व वस्तुंची खरेदी लोक घरबसल्या इंटरनेटवर करून पैसेही नेटवरच पाठवतील.

कार्पोरेट क्षेत्रामध्ये सतत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरची डिल्स करण्यात मग्न असलेले जैन व्यक्तीगत पातळीवर मात्र मराठी मध्यमवर्गीय आवडी निवडी जपणारे आहेत. मराठी पुस्तकांच्या वाचनाची त्यांना आवड आहे. त्याच्या व्यस्त वेळापत्रकात वेळ काढून ते नवी जुनी मराठी, इंग्रजी, मारवाडी पुस्तक वाचत असतात. अस्सल मराठी साहित्यांमधून मिळणारी उर्जा त्याच्या कामासाठी बळ देते असा त्याचा अनुभव आहे.

म्हणूनच साध्या तर्कांने कळणारा हा माणूस नव्हे तर [illegible]वी कार्पोरेट करिअर आणि कला, साहित्य व सव[illegible]ाठी लेखन यांची मोट बांधण्याचं अजब कसब जमलेली ही लाजवाब व्यक्ती होय.

नंदनगरीतील आमच्या असंख्य
ग्राहक व नागरिकांना
दिपावलीचा हार्दिक शुभेच्छा
नेमीचंद फुलचंद जैन (पतोदी )
केरोसीन अर्धघाऊक परवानाधारक
नंदुरबार मो.९४२२७८९११०

आमच्या असंख्य ग्राहकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मे.कल्याणी गॅस एजन्सी
प्रो.एस.एस.शिंदे
माणिक नगर, एलआयसी ऑफिसजवळ,
नंदुरबार
२४ तास बुकिंगची सोय-मो.०९४२२३१०१२६० ह्या नंबरवरच बुकींग स्विकारली जाईल. डिस्ट्रीब्युटर्स फो.नं.२२१५७६
ग्राहकांनी आणीबाणीचा काळात फो.नं.२२१५७६ मो.९४२२७८९१७६ यावर संपर्क करावा.